


# 'वीर चक्र' सन्मानित कॅप्टन अशोक कृष्णराव करकरे यांची शौर्यगाथा

वर्धा येथील कृष्णराव व सुमती करकरे यांच्या घरात ३० जून १९४२ रोजी 'अशोक' नामक पुत्र रत्नाचा जन्म झाला. २९ वर्षांनंतर हा सुपुत्र केवळ आपल्या कुळालाच नव्हे तर भारत मातेलाही अलौकिक गौरव प्राप्त करुन देईल, असे त्यावेळी कदाचित त्यांच्या ध्यानीमनीही नसावे.

लहानपणी काहीशा संकोची, लाजऱ्या-बुजऱ्या स्वभावाचा अशोकला शारीरिक सुदृढता व कणखर मनोबळाची दैवदत्त देणगी लाभलेली होती. निर्भयता, निर्णयक्षमता, मर्यादशीलता, दिलदारपणा असे दुर्मिळगुण आणि मरण आले तरी बेहत्तर, पण आपले ध्येय गाठायचेच अशी असीम जिद्द असलेला लहानग्या चणीचा अशोक कुटुंबीयात आणि मित्रांमध्ये विलक्षण लोकप्रिय होता. अरुण व शशिकांत हे त्याचे भाऊ तर शीला ही बहीण! सर्व भावंडात अशोकची स्वप्ने पहिल्यापासून वेगळीच होती. सेनेत भरती होऊन देशाची सेवा करण्याची ध्येय निश्चिती त्याचा मनात केव्हाच पक्की ठरलेली होती. यात एक मोठा अडथळा होता तो म्हणजे उंचीचा. कारण सैन्यदलात भरतीसाठी अत्यावश्यक असलेल्या उंचीच्या मोजमापात त्याची उंची किंचित कमी भरत होती. प्रमाणित उंची गाठण्याच्या दृष्टीने अशोकने नानाप्रकारे प्रयत्न केले, मेहनत घेतली पण दुर्दैवाने त्याला प्रत्येक खेपेला अपयशालाच सामोरे जावे लागले.

वर्धा, दिल्ली व लंडन या ठिकाणी आपले शिक्षण पूर्ण करणाऱ्या अशोकच्या आयुष्याला अचानक कलाटणी मिळाली, ती १९६२मध्ये. चीन विरुद्धच्या युध्द बांधणीसाठी त्या सुमारास लष्करातर्फे एक भरती मोहीम सुरु करण्यात आली होती. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन अशोक मुलाखतीसाठी पात्र ठरला. मुलाखत पॅनल प्रमुख असलेल्या जनरलचा नकारात्मक शेरा अपेक्षित असलेल्या अशोकने या खेपेला आपले ठोस उत्तर ही मनाशी तयार करुन ठेवले होते. जनरल म्हणाले, ''वेल् मिस्टर अशोक, तुम्ही भरतीतले सारे निकष पार केलेत पण...'' ''सर, ठाऊक आहे मला की माझी उंची हाच एक अडथळा त्यात आहे. पण सर, युध्दभूमीवर सर्वात उंच सैनिकच सर्वप्रथम लक्ष्य ठरतात व माझ्यासारखा छोटा जवान अंतीम क्षणापर्यंत झुंज देऊ शकतो. देशाची सेवा करताना मरण आले तरी बेहत्तर पण आयुष्यात एकदा तरी मला ही संधी द्या!'' तरुण अशोकचा उत्साह, आत्मविश्वास व समर्पणभाव मुलाखतकारांना भावला आणि नियमाला अपवाद करुन त्या शौर्याला कर्तृत्त्वाचे पंख लाभले.

...आणि अशोक करकरे यांनी आपले शब्द अक्षरशः खरे करुन दाखवले. अखेरच्या श्वासापर्यंत निडरपणे ते शत्रूशी लढले आणि देशासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

१९६२ मध्ये मद्रासच्या ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूलमध्ये 'ट्रेनी ऑफिसर' म्हणून सैन्यातील कारकीर्दीस सुरुवात करणाऱ्या अशोक करकरेंची १९६४ मध्ये नियुक्ती झाली व १९६५ च्या भारत-पाक युद्धात 'सेकंड लेफ्ट. इन्फन्ट्री ऑफिसर' म्हणून त्यांनी गौरवास्पद कामगिरी केली. १९६७ मध्ये 'फर्स्ट लेफ्टनंट' व १९६९ मध्ये 'कॅप्टन' या पदावर

त्यांना बढती मिळाली. सुमारे १५० जवान व कित्येक लार्ज फिल्ड गन्सचा भरणा असलेल्या आर्टिलरी विभागाचा स्वतंत्र कार्यभार त्यांच्यावर सोपविण्यात आला. त्यावेळी पंजाबच्या पश्चिमेकडील सीमा प्रदेश हे त्यांचे कार्यक्षेत्र होते. १९७० मध्ये त्यांचा विवाह एअर मार्शल अलुरकर यांची कन्या वसुंधरा हिच्याशी झाला. पठाणकोटच्या लष्कर केंद्रात कुटुंबासह काही काळ राहण्याची संधी त्यांना मिळाली. नवविवाहित दांपत्य विवाहानंतरच्या सोनेरी दिवसांची लज्जत अनुभवत असतानाच ऑक्टोबर १९७१ मध्ये पुन्हा एकदा भारत-पाक युध्दाचे काळेकुट्ट ढग दिसू लागले. अशोक करकरेंच्या तुकडीला पश्चिम सीमारेषेलगतच्या युध्द प्रांतात तातडीने जाण्याचा आदेश मिळाला. जवान व अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांना तेव्हा घरी परतावे लागले. अवघ्या १६ महिन्यांच्या विवाहित अशोक व वसुंधरा यांच्या संसार वेलीवर एव्हाना अर्चनाच्या रुपाने इवलीशी कलिका बहरली होती. पण अशा परिस्थितीत अशोक यांना तरुणपत्नी व चिमुकल्या कन्येला माघारी सोडून युद्धासाठी निघून जावे लागले. रवानगीही इतक्या तातडीने झाली की, अशोक करकरेंना प्रिय पत्नी व कन्येचा धड निरोप घेण्याची देखील संधी मिळाली नाही.

**<u>चांदबिबी चांद ची लढाई...</u>**

कॅप्टन अशोक करकरेंची तुकडी पंजाबमधील खालरा या सीमेलगतच्या चौकीवर रक्षणासाठी सज्ज असतानाच ७ डिसेंबर १९७२ च्या मध्यरात्री पाकिस्तानने या चौकीवर ताबा मिळविण्यासाठी निकराचा हल्ला चढविला. अशोक करकरेंच्या नेतृत्त्वाखाली जवानांनी शौर्याची परिसीमा गाठत हा हल्ला परतवला. पाक सैनिकांनी तात्पुरती माघार घेतली खरी पण नंतर ते पुन्हा अधिक त्वेषाने रणगाड्यांसह चालून आले. अन्न-पाण्यावाचून अथक ७ तास लढा देऊनही फारसा परिणाम दिसेना. तेव्हा अधिक संभाव्य हानी टाळण्यासाठी व आपत्कालिन खबरदारीचा उपाय म्हणून अशोक करकरेंनी सैन्य माघारी घेत सैनिकांना चौकीचे रक्षण करुन शत्रूच्या दिशेने गोळीबार करत राहण्याचे आदेश दिले. मात्र तरीही शत्रू सैन्य पुढे पुढे येतच राहिले. एका क्षणी ते थेट समोर येऊन उभे ठाकले. मृत्यू अगदी समीप दिसत होता. पण तरीही झुंजारपणे लढून मातृभूमीचे रक्षण करताना अखेर अशोक करकरे शहीद झाले. देशासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढेन हे आपले वचन त्यांनी निभावले. अशोक करकरेंचे बलिदान व्यर्थ ठरले नाही. कारण पुढे लवकरच १७ डिसेंबरला भारताने ऐतिहासिक विजय नोंदवला. अशोक करकरेंच्या शौर्याला त्रिवार वंदन!!!

कथा - अरुण करकरे
शब्दांकन - दिनेश अडावदकर

# करकरेंचा पत्र-संवाद

विवाहानंतर अवघ्या १६ महिन्यानंतर कॅ. अशोक करकरे यांना पत्नी अंजली, लहान मुलगी अर्चना व कुटुंबीयांचा निरोप घेऊन तातडीने युद्धभूमीवर जावे लागले. याच युद्धात शत्रूशी झुंजारपणे लढताना कॅ. करकरे शहीद झाले.

पण त्या काळात कुटुंबीयांसोबत त्यांचा पत्रसंवाद सुरु होता. एकीकडे कुटुंबियांविषयीच्या ओतप्रोत जिव्हाळ्याने भरलेल्या या पत्रातून कॅप्टन करकरेंच्या मनाची घालमेल दिसून येते, तर दुसरीकडे त्याचवेळी देशाप्रतिचे आपले कर्तव्य निडरतेने बजावण्याचा निर्धारही त्यातून व्यक्त झालेला दिसतो. कोणत्याही क्षणी मृत्यूला सामोरे जावे लागेल, पण त्याची मानसिक तयारी त्यांनी आधीपासूनच केलेली होती, हेही या पत्रातून स्पष्टपणे जाणवतं. मन हेलावून टाकणारी कॅप्टन करकरेंची ही पत्रे भारतीयांसाठी एक अनमोल प्रेरणादायी ठेवाच आहेत जणू...

**दिनांक १७ ऑक्टोबर १९७१**

प्रिय डॅडी-मम्मी,

पत्राला विलंब झाल्याबद्दल क्षमस्व. पण मला खरोखरच क्षणभराचीही उसंत मिळत नाही. अंजली व छकुलीचा तर निघण्यापूर्वी मला धड निरोपही घेता आला नाही. त्यांच्या सोबत फार काळ राहता आलं नाही, याचं मला अत्यंत वाईट वाटतं. मी अंजूला हैदराबादला पत्रही पाठवलं आहे. ती सुरक्षितपणे तिथे पोहोचली असेल अशी आशा बाळगतो. तुम्ही तिला अधून-मधून पत्राद्वारे धीर देत राहावा, ही विनंती. कारण त्यामुळे तिचं मनोबल वाढेल. ती मनाने फार संवेदनशील असल्याने तिच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो.

मी इकडे अगदी ठीक आहे. पण तुमचं काय ? तुम्ही सर्व कसे आहात ? प्रकृतीकडे लक्ष द्यावे. ताई, मामा व शशी यांना माझा प्रेमपूर्वक नमस्कार सांगा. लवकरच आपण सर्वांनी पुन्हा भेटावं अशी मी ईश्वराकडे प्रार्थना करतो. काळाच्या विशाल पटावर आपली आयुष्य फारच चिमुकली असतात, त्यामुळे परस्परांना धरुन राहण्यातच भलेपणा आहे.

काळजी नसावी. आपल्याकडून लवकरात लवकर पत्रोत्तराची अपेक्षा करतो.

आपला नम्र

अशोक.

# करकरेंचा पत्र-संवाद

दि. १३ नोव्हेंबर १९७१

माझ्या प्रिय डॅडी व मम्मीस,

तुमचे पत्र मिळाले वाचून आनंद झाला कारण आता तुमची प्रकृती ठीक आहे. अशीच आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी ही विनंती आहे.

दिवाळीचे खाऊचे पार्सल पाठवू नये. ते पोहोचेपर्यंत खराब होणार. माझी लग्नानंतरची ही पहिली दिवाळी सुध्दा साजरी करता आली नाही. याबद्दल खंत वाटते. देवाची इच्छा, त्याच्यापुढे काय चालणार ?

आत थोडे खाजगी बोलतो ते जरा समजून घ्यावे. जर मला पी. ओ. डब्ल्यू म्हणून या युध्दात पकडले तर ?

मी ८०० रुपयाची ॲलॉटमेंट अंजूच्या नावाने लिहिली आहे. ती आर्मीकडून तिला मिळेलच. पण दैवीकृपेने असे काहीही होणार नाही ही प्रार्थना! मी एखादे वेळेस तुम्हा सर्वांना पेचात टाकीत असेन पण ही वस्तुस्थिती आहे.

बरे असो, काही नवीन नाटक किंवा सिनेमा पाहिलात का ? मिसेस खांडेकर कशा वाटल्या ? त्यांनी तुम्हा सर्वांना आमच्याबद्दल व आमच्या आर्मीस्टेशनची सर्व माहिती दिलीच असेल.

मी अरुण व ईश्वरीकडून काहीच ऐकलं नाही. मला त्यांचा मुंबईचा पोस्टल ॲड्रेस पाठवा. मी अरुणच्या ऑफिसच्या पत्त्यावर पत्र पाठविले आहे. त्याला ते मिळाले असेल..

मी शीलाताईस सुध्दा पत्र लिहिले आहे त्याचे उत्तर पण मला मिळाले.

मला हातमोजे नको कारण माझ्याकडे आहेत. इथे आता थंडी पडावयास लागली आहे.

बाकी सर्व ठीक आहे. काळजी करु नये. सर्व ठीक होईल. आजीला नमस्कार, चि. शशीस परीक्षेच्या शुभेच्छा! मी त्यालासुध्दा पत्र लिहिणार आहे.

तुमचा

अशोक.

# करकरेंचा पत्र-संवाद

दि. २४ नोव्हेंबर १९७१

प्रिय बंधू अरुण,

सर्वप्रथम तुझ्या वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा! सध्याची स्थितीच अशी आहे की मला इतक्या कोरडपणानं शुभेच्छा द्याव्या लागत आहेत. पण तू समजून घेशील अशी अपेक्षा आहे..

अंजू आणि छोटीला सोडून मला तातडीने ड्यूटीसाठी जावं लागलं हे तुला ठाऊकच आहे. गेल्या दीड वर्षात आम्ही जिप्सीसारखं आयुष्य जगताना जेमतेम चार एक महिनेच काय ते एकत्र घालवले असतील. मला त्यांची फार आठवण येते. आणखी किती दिवस हा दुरावा सहन करावा लागणार आहे कोणास ठाऊक? पण सध्याची परिस्थिती पाहता तो लवकरच संपेलसं वाटत नाही. युद्ध सुरु झालंच तर माझ्यावरील कौटुंबिक जबाबदाऱ्यांचं काय याची चिंता मनाला कधीकधी फार सतावते. माझी स्वत:ची नाही, पण अंजू आणि छोटीची काळजी वाटते. ६५ च्या युद्धाच्या वेळची परिस्थिती निराळी होती आणि आताची परिस्थिती निराळी आहे. सुरळीत घडलं तर ठीकच; पण शेवटी दुसरी काळी बाजूही दुर्लक्षित करुन चालत नाही. तेव्हाच परिस्थितीला तोंड देता येतं. तशी पुरेशी तजवीज मी करुन ठेवलेली आहे. डॅडींना त्याबाबत मी सारं आधीच सांगितलं आहे. अंजूला मात्र कल्पना दिलेली नाही कारण ती विनाकारण आधीच धसका घेईल. असो, तुझ्याकडे सर्व क्षेम असेल असेल, अशी आशा करतो. इशू वहिनीला नमस्कार आणि सुजूला प्रेमपूर्वक आशीर्वाद!!

तुझा

अशोक

# करकरेंचा पत्र-संवाद

अशोकचे अरुणला लिहिले शेवटचे पत्र. हे पत्र वीरगती प्राप्त होण्याच्या २४ तास अगोदर लिहिले होते. ८ डिसेंबर १९७१ रोजी सकाळी १०.३० वाजता अशोकला वीरगती प्राप्त झाली.

**दि. ०७ डिसेंबर १९७१**

प्रिय अरुण यास,

मी एकदम फिट व हायस्पिरीटमध्ये आहे. माझी काळजी करु नकोस.

तुझे व ईश्वरीचे सर्व ठीक आहे, हे पत्राद्वारे कळले. ऐकून बरे वाटले. तू परीक्षेत पास झालास, माझ्या शुभेच्छा!

तुझी व डॅडींची पत्रे मला नेहमीच दिलासा देतात.

अरुण, जर मला काही झाले तर तू व ईश्वरी वहिनीने, अंजली व पीटीकडे लक्ष द्यावे, त्यांना मदत करावी. ही माझ्या आर्मी जीवनाची सत्यता आहे व त्याला सामोरे जावेच लागेल.

मी देवाजवळ प्रार्थना करतो की एक दिवस आपण सगळे मिळून सेलिब्रेट करु.

तुम्हा दोघांना शुभेच्छा आणि सुजातास बहुत प्यार..

तुझा,

अशोक.

# करकरेंचा पत्र-संवाद

अरुणने अशोकला मुंबईहून लिहिलेले शेवटचे पत्र. दि. ११ डिसेंबर १९७१ ला अशोकला पाठवलेले पत्र आर्मी पोस्ट ऑफिसरने अरुणला परत पाठविले. त्या पत्रात त्याने लिहिले की कॅप्टन अशोकला वीरगती प्राप्त झाली.

**दिनांक ११ डिसेंबर १९७१**

प्रिय अशोक यास,

हे पत्र मी फारच बिकट मन:स्थितीत लिहित आहे. मनात दु:ख, हुरहूर होत आहे.

दु:खाचे कारण असे की या युध्दात आपल्या जवानांचे बलिदान व देशाचे नुकसान झाले आहे. पाकिस्तानने हे युद्ध आपल्यावर लादले आहे.

आनंद असा की हे युध्द भारत जिंकणार हे नक्कीच. आज प्रत्येक भारतीय नागरिक आपल्या जवानांसाठी अतोनात मदत करायला तयार आहे.

मी दररोज सकाळी सगळे न्यूजपेपर वाचतो. युद्धात काय होत आहे ते वाचत असतो. आपल्या एअर फोर्सने सुध्दा छान कामगिरी केली आहे. आपल्या प्रत्येक भागात सगळीकडे देशप्रेम दिसते.

मी नेव्हीबरोबर काम करतो आहे. कारण आपले सगळे पोर्टस त्यांच्या हाती काम करत आहेत. मला खरोखरचं तुम्हां सगळ्या जवानांवर नाज आहे. मला माहीत नाही की तू कुठे आहेस ? जिथे असशील तिथे देव तुला सुखरुप ठेवो.

तू जे काही मला खास लिहिले आहेस त्यावर मी एकच बोलू शकतो की तू गीतेवर विश्वास ठेव व आपले कार्य करत रहा. देव तुझ्या पाठीशी उभा आहे. तू देवावर विश्वास ठेव. मी तुला वचन देतो की मी माझे कर्तव्य पार पाडीन.

तू तुझ्या सर्व शक्तीनिशी शत्रूशी झुंज दे. ताकद पणाला लावून लढाई कर व देशाची सेवा कर. मला तुझा भाऊ असण्यावर नाज आहे. खरोखर मी किती नशिबवान आहे, तुझ्यासारखा बंधू मला मिळाला त्याबद्दल मी देवाला धन्यवाद देतो.

तुझ्यावर देवाची कृपा असो.

इंदौरला सर्व काही ठीक आहे. काळजी नसावी.

तुझा

अरुण.

# करकरेंचा पत्र-संवाद

हे पत्र कर्नल खांडेकरांचे आहे की जे अशोकचे कमांडिंग ऑफिसर होते. त्यांच्या ऑर्डरमुळे अशोकने पाकिस्तानी चौकीवर हल्ला केला आणि लढता -लढता शहीद झाला. सदरच्या पत्रात त्यांनी सगळी माहिती लिहीली आहे..

**दि. ३१ डिसेंबर १९७१**

प्रिय भैयासाहेब यांस,

तुमचे २८ डिसेंबर १९७१ चे पत्र मिळाले. तुम्ही अशोकच्या बाबतीत काही प्रश्न विचारले आहेत; ते सगळे उचित आहेत.

मला माझ्या मिसेसने कळविले आहे की तुम्ही हैद्राबादला गेला होता. मी अंजलीला २० डिसेंबरला एक टेलिग्राम पाठविला व त्यात कळविलेकी आजच पाकिस्तान बटालियनने अशोकची बॉडी (शव) आम्हाला दिली. अशोकच्या चेहऱ्यावर खूपच खूणा व मारहाणी दिसली. अशोकचे बुट व शरीराची साईज पाहून आम्हाला अशोकची ओळख पटली. त्याच्या युनिफॉर्मच्या नेम टॅगवर त्याचे नाव होते, कॅप्टन ए. के. करकरे, आईडेंटी कार्ड, पत्रे व डिस्क हे मात्र पाकिस्तानी आर्मीने आपल्याकडे ठेवून घेतले.

आपल्या बटालियनमध्ये अशोक सर्वात कमी उंचीचा होता. त्याच्या असिस्टंटने मला सांगितले की अशोकला गोळी लागल्यावर त्याचा प्राण गेला. त्यांनी अशोकच्या बॉडीला भारतीय सीमेत आणण्याचा खूप प्रयत्न केला पण त्यांना ते शक्य झाले नाही.

युध्द संपल्यावर पाकिस्तानच्या ऑफिसरने आम्हाला सांगितले की अशोकच्या चेहऱ्यावर एक स्कार होता. त्याचे शरीर आम्हाला युध्दभूमीवर मिळाले. हे सर्व कळल्यावर आम्हाला फारच दु:खाने सांगावे लागते की कॅप्टन अशोक करकरे हे युध्दात शहीद झाले.

मी अशोकचे क्रियाकर्म केले व त्याला अग्नी दिला. त्याच्या अस्थी मी हैद्राबादला पाठविल्या कारण तुम्ही तिथे होता.

अशोक गेल्यामुळे आम्हा सगळ्यांना व जवानांना अतिशय दु:ख झाले. परंतु हे कळविण्यास अभिमान वाटतो की अशोकने आपल्या मोर्चावर फारच बहाद्दुरीने कारवाई केली. सोबतच्या सर्व जवानांना प्रोत्साहित केले. तो शेवटपर्यंत आपल्या देशाकरता लढत राहिला. आम्ही त्याला कधीच विसरणे शक्य नाही.

मी त्याला गॅलंट्री ॲवार्डकरीता सरकारकडे अर्ज पाठविला आहे आणि मला खात्री आहे की ते त्याला नक्की मिळेल.

आम्ही खांडेकर फॅमिलीकडून तुम्हा सगळ्यांना, अशोकच्या आई-वडिल व पत्नीला शोक संदेश पाठवत आहे.

अशोक माझ्या कमांडखाली फारच छान काम करीत होता. त्याने आमच्या रेजीमेंट व बटालियनचे आणि आर्टलरीचे नाव उज्ज्वल केले आहे. मी स्वत: तुम्हांला भेटावयाला येत आहे. पण सध्या इथे अजूनही स्थिती नॉर्मल नाही.

देव तुम्हां सर्वांना हा हादरा सहन करण्याची शक्ती देवो.

तुमचा

अनंतराव खांडेकर